FO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** वाई

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0335 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/12/2024 05:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिनांक पासून):** 08/12/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/12/2024

**Time From (वेळेपासून):** 19:41 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 21:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/12/2024 **Time (वेळ):** 04:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/12/2024 05:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पेट्रोल पंपासमोर,एव्हरग्रीन मिरर हाऊस या दुकाना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश पोपट निकम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | करंदी तर्फ कुडाळ ,जावली जि सातारा ,मेढा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | करंदी तर्फ कुडाळ ,जावली जि सातारा ,मेढा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8888410909

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शरद लिंबराज साळुंके | | | 1. तिपरगा, रवा,लोहारा जि धाराशीव,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 09/12/2024
मी श्री. निलेश पोपट निकम वय- 34 वर्षे, शिक्षण- एम.ए. व्यवसाय-खाजगी नोकरी रा.करंदी तर्फ कुडाळ ता.जावली जि. सातारा मो.नं. 8888410909
समक्ष हजर राहुन जबाब देतो की,मी दिनांक 08/12/2024 रोजी ए.सी.बी, कार्यालय, सातारा येथे 13.00 वा. चे सुमारास हजर होवून डीवायएसपी श्री राजेश वाघमारे साहेब यांना माझ्याकडे होत असलेल्या लाचेच्या मागणी बाबतची तक्रार थोडक्यात सांगितली. डीवायएसपी वाघमारे साहेब यांनी मला कारवाईचे पुढील नियोजन थोडक्यात सांगितले. व माझ्या तक्रारीवर पुढील कारवाई ही पोलीस निरीक्षक श्री श्रीधर भोसले हे करणार असल्याचे सांगितले. त्यानुसार डीवायएसपी वाघमारे यांनी त्यांचेकडील नेमणुकीचे पोलीस निरीक्षक श्री. भोसले यांची समक्ष भेट घालून दिली व माझी तक्रार थोडक्यात पो.नि. भोसले यांना सांगून त्यावर पुढील कायदेशीर कारवाई करण्याबाबत त्यांना आदेशीत केले.
त्याप्रमाणे पो.नि.भोसले यांनी दिनांक 08/12/2024 रोजी 16.00 वाचे त्यांचे दालनात बोलावून घेवून समक्ष हजर असलेली महिला व पुरुष यांची आम्हाला एकमेकांना ओळख करून देवून सदर कारवाई मध्ये ते पंच नं. 1 म्हणून अर्चना निकम व पंच नं. 2 म्हणून रविंद्र पवार काम करणार असल्याचे सांगितले. तसेच दालनात हजर असलेले सापळा पथकामधील पोलीस हवालदार नितीन गोगावले, पोलीस हवालदार निलेश राजपूरे, पोलीस कॉस्टेबल विक्रम कणसे यांची ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि.भोसले यांनी माझे तक्रारीबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता मी त्यांना दिनांक 04/06/2024 मौजे करंदी त.कुडाळ ता.जावली येथील गट नं. 610 मधील क्षेत्र 10 गुंठे जमीन ही दिलीप दिनकर गंगावणे, निवास दिनकर गंगावणे, विलास दिनकर गंगावणे यांचे कडून खरेदी केली आहे. सदर जमीनाचा खरेदी दस्त क्र. 761/24 प्रमाणे झाला असून सदर खरेदी दस्ताची नोंद करून माझ्या नावाचा सातबारा मिळणेकरिता ऑगस्ट 2024 मध्ये करंदी त.कुडाळ गावचे तलाठी शरद साळुंके यांना भेटून त्यांना माझेकडील खरेदी दस्ताची झेरॉक्स प्रत व अर्ज दिला होता. त्यावेळी त्यांनी माझे खरेदी दस्ताची नोंद 21 दिवसामध्ये करून देतो असे म्हणून त्या कामासाठी माझेकडे 1000/- रु लाचेची मागणी केली होती. तेव्हा मी नाईलाजाने त्यांना ती रक्कम दिली होती. त्यानंतर मी त्यांना वारंवार भेटून माझ्या कामासंदर्भात विचारणा केली असता मला इलेक्शन ड्युटी आहे इलेक्शन झाल्यानंतर तुमचे काम करून देतो असे सांगत होते. परंतू त्यांनी आज अखेर पर्यंत माझे काम केले नाही.
आज दिनांक 08/12/2024 रोजी मला 11.38 वाचे सुमारास तलाठी साळुंके यांचा मला फोन आला. त्यांनी माझेशी माझ्या कामासंदर्भात चर्चा करून तुमच्या दस्ताची नोंद मी घातली असून, मंडलअधिकारी यांनी सदरचा दस्त चुकला असल्याचे सांगितले असून तो दस्त दुरुस्त करावा लागेल परंतू मी माझे स्तरावर तुमचे काम करून देतो, आज ऑफिसला सुट्टी असून मी वाई येथे राहत आहे तरी तुम्ही मला वाई येथील गणपती मंदीर या ठिकाणी 6 ते 7 वाचे सुमारास 5000/- रु घेवून भेटायला या असे म्हणाले. तेव्हा तलाठी साळुंके हे माझे दस्त नोंदीचे काम करून देणेसाठी माझ्याकडे 5000/- रु लाचेची मागणी करीत असल्याची माझी खात्री झाली आहे. तलाठी साळुंके यांना ते मागणी करीत असलेले 5,000/- रु दिले नाहीत. तर ते माझे काम करणार नाहीत याची मला खात्री आहे. त्यामुळे मी त्यांना त्यांची भेट घेण्यासाठी होकार दिला आहे. तलाठी साळुंके हे मागणी करीत असलेली लाच रक्कम त्यांना देण्याची माझी अजिबात इच्छा नाही. तरी तलाठी साळुंके हे माझ्याकडे 5000/- रु लाचेची मागणी करत असून त्यांचेवर आपले विभागामार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी असे सांगितले व माझी हाताने लिहिलेली तक्रार मी पो.नि. भोसले यांना दिली असता पो.नि.भोसले व पंचांनी ती वाचून बघितली व त्यावर सह्या केल्या.व त्यासोबत मी माझा दस्त क्रमांक 761/24 सुची क्रमांक दोन अशी कागदपत्रे सादर केली.
त्यांनतर पो.नि.भोसले यांनी तलाठी साळुंके यांनी मला वाई येथे भेटण्यास बोलाविले असल्याने पुढील कारवाई वाई

येथे जावून करायची असल्याचे सांगून कारवाई साठी लागणारे साहित्यासह सापळा पथक व पंच हे शासकीय वाहन क्र. एमएच 11 डीएच 8216 मधून व त्याचे पाठीमागे मी माझे चारचाकी वाहन एमएच 11 डीएन 3332 मधून एसीबी कार्यालय, सातारा येथून 16.45 वाचे सुमारास रवाना झालो. आम्ही बॉम्बे रेस्टॉरंट, पाचवड मार्गे वाई येथील चतुर्थी हॉटेलचे पाठीमागील पार्किंगमध्ये 17.15 वाचे सुमारास पोहोचलो.
त्यानंतर पो.नि.भोसले यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानुसार पो.नि.भोसले यांनी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने मला व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टच्या आतमध्ये असलेल्या बनियानमध्ये पिनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन लावून माझे व पंचांचे निवेदन रेकॉर्ड केले. त्यानंतर 18.36 वाचे सुमारास मी पंच नंबर 1 अर्चना निकम असे माझेकडील टाटा पंच चाकी गाडी क्र. एमएच 11 डीएन 3332 मधून वाई येथील गणपती मंदीर येथे तलाठी शरद साळुंके यांची भेट कामी घेणेकामी रवाना झालो. त्यावेळी पो.नि.भोसले व त्यांचे सहकारी त्यांचे वाहनात तिथेच थांबून राहिले. मी व पंच नं 1 निकम असे गणपती मंदीराजवळ आल्यानंतर मी तलाठी शरद साळुंके हे कोठे आहेत याची माहिती घेणेसाठी माझा मोबाईल नंबर 8888410909 वरून लोकसेवक तलाठी साळुंके यांचे 7972814920 मोबाईल नंबर वर स्पिकर चालू करून कॉल करून विचारले असता, त्यांनी मी वाई पाचगणी रोडवरील पेट्रोल पंपासमोर एव्हरग्रीन मिरर हाऊस या दुकानाजवळ असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच 1 निकम असे माझेकडील वाहनाने तलाठी साळुंके यांनी सांगितलेल्या ठिकाणी आलो. त्याठिकाणी स्पर्श भेळ या हॉटेलमध्ये तलाठी साळुंके यांचेशी भेट झाली. तेव्हा माझ्या कामासंदर्भाने चर्चा केली या चर्चेदरम्यान मी त्यांना मग आपल्याला कस काय तुम्ही सांगा असे म्हणालो त्यावर तलाठी साळुंके हे आवो तुम्ही एक हजार दिलेत ना पहिले. आस करां पाच देवून टाका तेव्हा मी त्यावर पंच नं 1 यांचेकडे पाहत पाचहजार दयायचे, व्हय गं, पाच हजार दिलेले बेटर होतील का असे म्हणून तलाठी साळुंके यांना कमी होतील का बघा. तेव्हा तलाठी साळुंके कमीत कमी त्याला असे म्हणाले. त्यावर मी त्याना चार हजारात हुईल का? असे म्हणालो असता, तलाठी साळुंके यांनी ठिक आहे द्या, बघा द्या, चार हजारात हुईल असे म्हणून तलाठी साळुंके यांनी माझ्याकडे तडजोडी अंती 4 हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर आमचेत माझ्या कामासंदर्भाने चर्चा झाली. त्यानंतर तलाठी साळुंके यांनी मला 4000/- रु लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास त्याच ठिकाणी येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 अर्चना निकम असे माझे चारचाकी वाहनामधून सापळा पथक थांबले ठिकाणी परत 19.06 वा.चे सुमारास आलो. त्यावेळी पो.नि.भोसले यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर त्यांना घडलेली हकीकत सांगितली. पो.नि. भोसले यांनी व पंचांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून खात्री केली की, तलाठी साळुंके यांनी माझेकडे तडजोडीअंती 4,000/- रु लाचेची मागणी करून ती लाच रक्कम लागलीच घेवून वाई पाचगणी जाणारे रोडवरील एव्हरग्रीन मिरर हाऊस या दुकानाजवळ बोलविले आहे. तेव्हा पो.नि. भोसले व पंचांनी पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला.
त्यानुसार लागलीच पो.नि.भोसले यांनी मला व पंचाना सापळा पुर्व व सापळा कारवाईची माहिती थोडक्यात समजावून सांगितली. वेळेच्या अभावी पडताळणी पंचनामा तसेच संभाषण स्क्रिप्ट नंतर टाईप करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर मी पो.नि.भोसले यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 4,000/- हजार रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचासमक्ष हजर केली. त्यानुसार पो.नि.भोसले यांनी दिले सुचनेवरून त्यांचे सहकाऱ्यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहून घेतले. पो.नि.भोसले यांनी अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यानंतर सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली. त्यानुसार पो.नि. भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी पंचासमक्ष सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली त्यामध्ये लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावली व सदरची अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम माझ्या शर्टच्या वरील डावेबाजूच्या खिशात अलगद ठेवून दिली. तलाठी साळुंके यांना लाचेची रक्कम दिल्या नंतर डाव्या हाताने डोक्यावरुन दोनदा हात फिरवून इशारा करण्याच्या सुचना पो.नि.भोसले यांनी मला दिल्या.
त्यानंतर पो.नि.भोसले यांनी पंचासमक्ष मला सापळा कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टचे आत मध्ये असलेल्या बनीयनला पीनच्या सहाय्याने व्हाईस रेकॉर्डर सुरु करून त्यामध्ये माझे व पंचांचे निवेदन रेकॉर्ड केले. पो.नि.भोसले यांचे सुचनेवरून मी व पंच नंबर 1 अर्चना निकम असे आम्ही दोघे माझ्याकडील चारचाकी वाहनामधून तलाठी साळुंके यांची त्यांनी सांगितले प्रमाणे वाई पाचगणी रोडवरील एव्हरग्रीन मिरर हाऊस या ठिकाणी भेट घेणे कामी 19.31 वाचे सुमारास रवाना झालो. आमचे पाठोपाठ पो.नि.भोसले व सापळा पथक हे त्यांचे शासकीय वाहनातून आले. पेट्रोलपंपासमोर वाहन उभेकरून मी व पंच नं.1 अर्चना निकम असे तलाठी साळुंके यांना भेटायला गेलो. त्यावेळी सापळा पथक पेट्रोल पंपाजवळ कोणास संशय येणार नाही अश्या रितीने सापळा लावून थांबून राहिले. मी व पंच नं.1 निकम यांचे समवेत तलाठी साळुंके यांची एव्हरग्रीन मिरर हाऊस दुकानाचे समोर भेट घेतली. त्यांचेशी माझे कामाबाबत चर्चा केली तेव्हा त्यांनी उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवरती घासून लाच मागणीचा

सुचक इशारा केला. तेव्हा मी त्यांना अँथ्रासीन पावडर लावलेली माझेकडील लाच रक्कम देत मोजून घ्या की, नाय नाय तसं नाय, नाय नाय तस नको, अहो माझं ऐका मोजा तसं असे म्हणालो, त्यावर तलाठी साळुंके हे आमचा असतो विश्वास असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना चार हजार रुपये दिल्यात असे म्हणालो, त्यावर तलाठी साळुंके हे आसु दया की मग काय होतयं असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना मोजून तरी घ्या असे म्हणालो असता त्यावर ते चारच बोलला होता ना तुम्ही असे म्हणाले, त्यानंतर मी त्यांना अहो, पण एकदा चेक करा, जास्त दिलेत, जास्त दिलेत म्हणून म्हणतोय चेक करा असे म्हणालो त्यावर ते आसुद्या, माझं मागचं काय विचारलं का तुम्हाला डायरेक्ट विचारलं मार्ग किती दिलेत ते माझ्या लक्षात नाय तो ॲडव्हान्स ठिक आहे, आपल तस नसतं असे म्हणाले तेव्हा मी त्यांना चार हजार दिलेत, तुम्ही सांगितल्याप्रमाणे चार हजार दिलेत फक्त मला येवढच सांगा आमचं काम कधी होणार असे म्हणून मी त्यांना अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम दिली असता ती त्यांनी उजव्या हाताने स्विकारून त्यांचे पँटचे पाठीमागील बाजूचे उजव्या खिशात ठेवली त्यावेळी मी सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने पुर्व नियोजीत डाव्या हाताने दोन वेळा डोक्यावर हात फिरवून इशारा केला असता पो.नि.भोसले यांचे सहकाऱ्यांनी येऊन लोकसेवक तलाठी शरद साळुंके यांना अँथ्रासीन लावलेल्या लाचेच्या रक्कमेसह 19.41 वा. चे सुमारास ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. भोसले यांचे सुचनेवरून पोहवा राजपूरे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर पो.नि.भोसले यांनी पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. वेळे अभावी त्याची स्क्रिप्ट नंतर करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष शासकीय वाहनामध्ये सापळा पंचनाम्याची पुढील सविस्तर कारवाई शासकीय विश्रामगृह, वाई येथे करण्यात आली.

अशा रितीने दिनांक 08/12/2024 रोजी लोकसेवक शरद लिंबराज साळुंके, तलाठी- सजा-करंदी त.कुडाळ वय-54 वर्षे सध्या रा. फ्लॅट नं. एफ-1, पहिला मजला, ए विंग, कोहीनूर रेसीडन्सी, मधली आळी, वाई मुळ रा. तिपरगा, (रवा) ता. लोहारा जि. धाराशीव यांनी माझे मौजे करंदी त.कुडाळ येथील गट नं. 610 मधील खरेदी केलेल्या 10 गुंठे जमीनीच्या खरेदी दस्ताची नोंद करून सातबारा उतारा देणेसाठी माझ्या माझ्याकडे स्वत:साठी तडजोडी अंती 4,000/- रु लाचेची मागणी करून ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली आहे म्हणून माझी त्यांचे विरुद्ध कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक शरद लिंबराज साळुंके यांचेशी कसलेही वैयक्तीक वैर नसुन माझा त्यांचेशी कसलाही पैशाचा अर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आला असून तो बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

JITENDRA Prabhakar SHAHANE(I (Inspector)) / BNMAH69255 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी-याची सही)
पोलीस स्टेशन ऑफिसर
गाई पोलीस स्टेशन
**Name** (नाव): JITENDRA Prabhakar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH69255